ePaper

## मुख्यमंत्र्यांच्या सभेला भाडोत्री गर्दी, पैसे देऊन लोकांना आणलं; खैरे



|| वर्ष - 7 | अंक - 318 || UDYAM-MH-26-0158827 ||

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत


- हरली लखनौ,आव्हान संपलं मुंबईचं
- रणवीर - दीपिकाच्या नात्यात दुरावा?
- डॉक्टरच रुग्णांकडून घेत होते लाच!
- पवार ठाकरे पक्ष काँग्रेसमध्ये विलीन ?


www.mahaenews.com | गुरुवार, दिनांक 9 मे 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## चार जून नंतर देशाचा पंतप्रधान इंडिया आघाडीचा होईल

# महाराष्ट्राने मोदींना रस्त्यावर आणले!

## » उद्धव ठाकरेः महाविकस आघाडीची सांगवीत प्रचार सभा




**| पिंपरी | महाईन्यूज**

**पराभवाची भीती वाटत असल्याने विरोधक राम राम राम करत आहेत. मोदींनी मुंबईत रोड शो केला. त्यांच्यावर रोड शो करण्याची वेळ आली आहे. महाराष्ट्राने मोदींना रस्त्यावर आणले, अशी टीका माजी मुख्यमंत्री शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी केली. चार जून नंतर मोदी पंतप्रधान राहणार नाहीत. देशाचा पंतप्रधान इंडिया आघाडीचा होईल, असा विश्वास देखील ठाकरे यांनी व्यक्त केला.**

महविकस आघाडीचे मावळ लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांच्या प्रचारार्थ सांगवी येथे जाहीर सभा झाली. यावेळी माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, खासदार सुप्रिया सुळे उपस्थित होते. उद्धव ठाकरे म्हणाले, निवडणूक जाहीर झाल्यानंतर मी पाहिली उमेदवारी संजोग वाघेरे यांची जाहीर केली. विरोधकांना काहीही मुद्दे राहिलेले नाहीत. त्यामुळे मोदींचे काय करायचे ते जनतेने ठरवलेले आहे. पराभवाची भीती वाटत असल्याने विरोधक राम राम राम करत आहेत. मोदींनी मुंबईत रोड शो केला. महाराष्ट्राने मोदींना रस्त्यावर आणले. त्यांच्यावर रोड शो करण्याची वेळ आली आहे. चार जून नंतर मोदी पंतप्रधान राहणार नाहीत. पंतप्रधान इंडिया आघाडीचा होईल.

हे मोदी सरकार नाही तर गजनी सरकार आहे. त्यांना काल काय बोललो ते लक्षात राहत नाही. निवडणूक रोख्यांचा घोटाळा हा जगातला सर्वात मोठा घोटाळा आहे. कंत्राटी पद्धतीने केंद्राने रोजगार दिले. त्यामुळे रोजगाराची गॅरंटी राहिली नाही. त्यामुळे मोदी सरकारचे कंत्राट जनता रद्द करणार आहे. बुरसटलेल्या मानसिकतेने तुकारामाची गाथा बुडविली, तीच मानसिकता आता संविधान बदलू पाहत आहे. महाराष्ट्रातून अनेक उद्योग केंद्राने बाहेर नेले. इंडिया आघाडीचे सरकार आल्यानंतर महाराष्ट्राचे लुटलेले वैभव दामदुपटीने परत आणीन. भाजपवर मुले आणि बाप चोरण्याची वेळ आली आहे. शिंदे सेनेचा करेक्ट कार्यक्रम जनता करणार असल्याचेही ठाकरे म्हणाले.

आपला हक्क मागण्यासाठी शेतकरी दिल्लीला जात होते. पण केंद्र सरकारने त्यांना दिल्लीला येऊ दिले नाही. सर्व शेतकऱ्यांनी आता मतदान केंद्रापर्यंत जाऊन या मोदी सरकारला पायउतार करावे, असे आवाहन देखील ठाकरे यांनी केले.

माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, " आपण आज योग्य निर्णय घेतला नाहीतर या देशात पुन्हा निवडणुका होणार नाही. संविधान बदलले जाईल. असे होऊ नये यासाठी ही निवडणूक महत्वाची आहे. पिंपरी चिंचवड शहरात एच ए कंपनी, टाटा कंपनी उभारण्यासाठी काँग्रेसच्या काळात सुरुवात झाली. या माध्यमातून लाखो लोकांना रोजगार मिळत आहे. मोदींनी मागील दहा वर्षात अनेक चुकीचे निर्णय घेतले. अर्थव्यवस्था धिमी झाली आहे. प्रचंड कर्ज देशावर झाले आहे. मनमोहन सिंह यांच्या गतीने भाजपने विकास केला असता तर भारत आज पाचव्या नव्हे तर तिसऱ्या स्थानी असला असता. ही निवडणूक महागाई, बेरोजगारी, शेतकऱ्यांचे प्रश्न, भ्रष्टाचार आणि गलिच्छ राजकारण या पाच मुद्द्यांवर लढली जात आहे.

महाराष्ट्रात शिवसेनेत फूट पाडण्यासाठी मोदी यांचा पाठिंबा होता. दिल्लीत सत्तांतर करायचे आहे. सत्तांतर आले नाहीतर संविधान बदलले जाईल. मोदींनी शेतकऱ्यांवर सूड घेण्यासाठी तीन कायदे केले. साखर, कांदा आणि अन्य उत्पादनांवर केंद्राने निर्यातबंदी केली आहे. त्यामुळे शेतकरी, युवक आणि महागाईने त्रस्त झालेली जनता मोदींना पाडेल. येत्या चार जूनला सत्तांतर होईल, असेही चव्हाण म्हणाले.

### पुढचे तीन चार दिवस जागरूक रहा

सुप्रिया सुळे म्हणाल्या, विरोधक मतदानासाठी पैशांचे वाटप करतील. अशा लोकांना पकडून थेट पोलीस ठाण्यात न्या. यावेळी बारामती लोकसभा मतदार संघात गलिच्छ राजकारण झाले. त्याचा अनुभव पाठीशी असताना मावळमध्ये आपण सर्व गोष्टींची खबरदारी घेऊन जागरूक राहिले पाहिजे. पुढचे तीन चार दिवस जागरूक रहा. वाघेरे माझ्यासोबत दिल्लीला येणार आहेत, अशी खात्री सुळे यांनी व्यक्त केली. सध्या सर्वात अधिक भ्रष्ट महापालिका म्हणून पिंपरी चिंचवड महानगरपालिका ओळखली जात असल्याचेही त्यांनी सांगितले.

### इंडिया आघाडीला सत्तेत आणावे लागणार

आपचे राज्यसभा खासदार संजय सिंह म्हणाले, “अरविंद केजरीवाल यांना भाजपने अटक केली. अशा संकटाच्या काळात इंडिया गटातील प्रत्येक पक्षाने ठामपणे सोबत उभे राहून सहकार्य केले. मोदी आणि भाजपवाले पक्षचोर आहेत. राष्ट्रवादीचे घड्याळ चोरले. शिवसेनेचा धनुष्यबाण चोरला. मोदी की एक ही गॅरंटी आहे, खोटं बोलण्याची गॅरंटी. ज्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप केले त्यांना भाजपने सोबत घेतले. चुकून भाजपने ही निवडणूक जिंकली तर भारतात पुतिन आणि किम जोंगप्रमाणे शासन करतील. त्यामुळे इंडिया आघाडीला सत्तेत आणावे लागणार आहे. मावळच्या जनतेने संजोग वाघेरे पाटील यांना निवडून द्यावे.

# सध्या ते बोलबच्चन करताहेत!

## त्याला मीच शोधून आणलं होतं”, पवारांचा कोल्हेंवर निशाणा

। घोडेगाव । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**विरोधक आता जे बोलबच्चन करतात त्यांना आम्हीच शोधून आणलं. मध्यंतरी ते राजीनामा देणार होते. पण मी त्यांना थांबवल. त्यामुळे ते आदिवासी भागात फिरकले नाही. शिवाजी महाराज आणि संभाजी महाराजांची भूमिका केली म्हणून तुम्ही त्यांना निवडून दिलं.**



अन् लगेच त्यांनी महात्मा गांधीच्या मारेकऱ्यांची नथूराम गोडसेची भूमिका केली. हा का स्वाभिमान? पैश्यांसाठी तुम्ही काय पण करतात. असा टोला पवार यांनी कोल्हेना लगावला.शरद पवार यांची तब्बेत बरी नसतानाही वयाच्या 84 वर्षी देखील आपल्या उमेदवारांचा प्रचार करीत आहेत. त्यामुळे त्यांची प्रकृती बिघडली असून सध्या ते विश्रांती घेत आहेत. यावर अप्रत्यक्ष भाष्य करीत अजित पवार म्हणाले की, “लोक स्वार्थी असतात. जोवर आमचे हात पाय चालू आहेत. तोवर तुम्ही आम्हाला प्रचाराला बोलवणार नंतर नाही. मागे एकदा पवार साहेबांना ऑपरेशन करायला सांगितलं होतं ; तेव्हा मी त्यांना म्हणाले, तुम्ही उपचार करून घ्या बाकी सगळं मी बघतो. फक्त शेवटच्या सभेला तुम्ही या. पण आता तसं उमेदवार करत नाही. शिरूर लोकसभा मतदार संघातील महायुतीचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या प्रचारासाठी घोडेगाव, ता. आंबेगाव येथे महायुतीची प्रचार सभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी अजित पवार बोलत होते. अजित पवार म्हणाले की, प्रत्येक उमेदवाराला कोणी ना कोणी संधी देत असतात. आम्हाला पवार साहेबांनी संधी दिली. तर पवार साहेबांना 1967 साली यशवंतराव चव्हाण यांनी संधी दिली. त्यामुळेच ते आपले कर्तृत्व दाखवू शकले. त्यानंतर 1978 साली पवार साहेबांनी चव्हाण साहेबांना सोडलं. हा इतिहास सांगतो. मग लोकं मला विचारतात ‘तुम्ही पवार साहेबांना या वयात सोडायला नको होतं’, मग त्यांनी काय केलं? त्यांनी तर 11 वर्षांतच चव्हाण साहेबांना सोडलं. मी तर 35 वर्ष साथ दिली आहे. साहेबांना आम्ही कितीदा सांगितलं की आता करतो आम्ही. पण त्यांनी आम्हाला नेहमी सांगितलं की मी सांगतो तसंच कर. मी चांगल करत नव्हतो का? आज आम्ही सरकारमध्ये सहभागी झालो म्हणून या भागात अनेक विकास कामे होवू शकली. नसतो तर एक रुपायांचाही निधी मिळाला नसतं. सगळी सोंग करता येतात पण पैशाच करता येत नाही.

### महायुतीच्या नेत्यांना दिल्या सूचना

बारामती लोकसभा मतदारसंघात मतदान पार पडल्यानंतर अजित पवारांनी आपला मोर्चा आता पुणे शिरूरकडे वळविला आहे. आज पुणे महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांच्यासाठी अजित पवारांनी पुण्यात महत्वाची बैठक घेतली. या बैठकीला मंत्री चंद्रकांत पाटील यांच्यासह मुरलीधर मोहोळ, रूपाली चाकणकर, दिपक मानकर, चेतन तुपे आणि प्रदीप देशमुख उपस्थित होते. यावेळी अजित पवारांनी पुण्यातील मतदारांशी संवाद साधत जनसंपर्क वाढवण्याचे आदेश दिलेत. बारामती लोकसभा मतदारसंघातील मतदान पार पडल्यानंतर आता पुणे आणि शिरूरमध्ये येत्या १३ तारखेला मतदान होत आहे. याच अनुषंगाने अजित पवारांनी पुण्यातील अंबड बॅंक्वेट वारजे येथे महायुतीच्या नेतमंडळी, पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक पार पडली. यावेळी पुण्यातील मतदारांशी संवाद साधत जनसंपर्क वाढवत जास्तीत जास्त मतदान करण्यासाठी प्रयत्न करण्याचे अजित पवारांनी आवाहन केले. त्याचबरोबर संघटनात्मक बांधणीवर लक्ष केंद्रीत करत मोदी आणि महायुती सरकारच्या योजना तळागाळातील सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहचिवण्यासाठी कार्यरत राहण्याच्या सुचनाही अजित पवारांनी यावेळी महायुतीच्या पदाधिकाऱ्यांना दिल्या. यातच मुरलीधर मोहोळ यांच्यासाठी पुण्यात अजित पवार यांच्या सभा देखील येत्या एक दोन दिवसात पार पडणार असल्याचे बैठकीत सांगण्यात आले.

# मोदींच्या विरोधात प्रचंड मोठी लाट : पृथ्वीराज चव्हाण

## सांगवीतील सभेत महाविकास आघाडीच्या नेत्यांचा सरकारवर प्रहार

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**देशातील ही लोकसभेची निवडणूक अत्यंत महत्वाची आहे. आर्थिक भ्रष्टाचाराबरोबर नैतिक व राजनैतिक भ्रष्टाचार मोदी सरकारकडून सुरू आहे. महागाईमुळे कंबरडे मोडले आहे. मोदी सरकार शेतक-यांचा सूड घेत आहे.**



देशभरात नरेंद्र मोदींच्या विरोधात प्रचंड मोठी लाट आहे, अशा शब्दात कॉंग्रेस नेते तथा माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी पिंपरी- चिंचवड सांगवी येथील महाविकास आघाडीच्या सभेत मोदी सरकार व भाजपवर सडकून टीका केली.शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) – कॉंग्रेस – राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरदचंद्र पवार) – शेतकरी कामगार पक्ष – स्वराज इंडिया – मित्र पक्ष महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांच्या प्रचारार्थ सांगवीतील पीडब्लूडी मैदानावर पक्षप्रमुख आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची सभा पार पडली. या सभेत ते बोलत होते.पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, मोदी सरकारमुळे बेरोजगारीचे भूत देशाच्या मानगुटीवर बसले. नोटबंदी, जीएसटी, शेतकरी काळे कायद्यांमुळे त्यांना अर्थव्यवस्था सांभाळता आलेली नाही. डिझेल, पेट्रोलच्या किंमती वाढवून देश महागाईच्या घाईत लोटला. मनमोहन सिंह यांच्या काळातील आर्थिक विकासाचा दर राहिलेला नाही. आमदारांची खरेदी-विक्री करून सरकारे पाडली जात आहेत. त्यांच्या मान्यतेने राज्य सरकारे पाडली जातात. ना खाऊंगा, ना खाने दुंगा म्हणणा-या मोदींचे सर्वात भ्रष्ट सरकार ते चालवत आहेत. भाजपच्या काळात पिंपरी चिंचवडमध्ये सर्वात मोठा भ्रष्टाचार आहे. महागाईमुळे कंबरडे मोडले आहे. शेतक-यांचा मोदी सूड घेत आहेत.साखरेवर, कांद्यावर निष्ठूरपणे निर्यातबंदी करून कोट्यवधी शेतक-यांचे नुकसान केले. निर्यात बंदी उठवून पुन्हा भरमसाठ कर लावला. शेतक-याला दिलेले एकही आश्वासन त्यांनी पूर्ण केलेले नाही. मोदींच्या विरोधात प्रचंड मोठी लाड तयार झालेली आहे. कॉंग्रेस पक्षाचे उत्कृष्ट जाहीरनामा दिलेला आहे. सर्व घटकांना न्याय देण्याचे काम इंडिया आघाडीचे सरकार करणार आहे. सत्तेचा मलिदा खाण्यासाठी आमदार फरपटत गेले. पण मतदार त्यांना धडा शिकविणार आहेत. महाराष्ट्रातील जनतेला फितुरी, गद्दारी, विश्वासघात चालत नाही. संजोग वाघेरेंच्या निमित्ताने चांगला खासदार निवडून द्या आणि उध्दव ठाकरेंचे हात बळकट करा, असे आवाहन त्यांनी केले.

### “रामकृष्ण हरी, आमची मशाल भारी

तीन आपला लकी नंबर असून महाराष्ट्राच्या स्वाभीमानासाठी मतदान करा. वाटप होणार, तर होणार आहे. गलिच्छ राजकारण सुरू आहे. राज्यात लाडके मुख्यमंत्री म्हणून उध्दव ठाकरे यांचे नाव आदराने घेतले जाते. त्यांच्याकडून आमच्या सर्वांच्या प्रचंड अपेक्षा आहे. इंडिया आघाडी एक कुटुंबाप्रमाणे काम करत आहे. संजोगभाऊ तुम्हाला माझ्याबरोबर दिल्लीला चलायचं आहे. देशातील सर्वात भ्रष्ट महापालिका म्हणून पिंपरी चिंचवडला म्हटले जाते. भ्रष्टाचार, महागाई, बेरोजगारी हद्दपार करण्यासाठी मतदान करा. मावळमध्ये “रामकृष्ण हरी, आमची मशाल भारी” हा नारा आपल्याला बुलंद करायचा आहे, असे आवाहन त्यांनी केली.

# ‘मोदींच्या नेतृत्वाखाली आणणार शिवशाही आणि रामराज्य!

## मावळच्या विकासात खासदार बारणे यांचा सिंहाचा वाटाः नितीन गडकरी

। कर्जत ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आम्हाला देशात ‘शिवशाही’ व ‘रामराज्य’ आणायचे आहे, असे भाजपचे ज्येष्ठ नेते व केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितले. मोदी सरकारने गेल्या दहा वर्षात केलेले काम हा फक्त ट्रेलर होता, खरा चित्रपट तर अजून सुरू व्हायचा आहे, असेही ते म्हणाले.**



मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेना-भाजप-राष्ट्रवादी- मनसे-आरपीआय-रासप-मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारासाठी कर्जत तालुक्यात चौक फाटा येथे झालेल्या जाहीर सभेत गडकरी बोलत होते. व्यासपीठावर शिवसेना नेते गजानन कीर्तिकर, रायगडचे पालकमंत्री उदय सामंत, खासदार बारणे, ज्येष्ठ नेते रामशेठ ठाकूर, आमदार महेश बालदी, प्रशांत ठाकूर, महेंद्र थोरवे, माजी आमदार देवेंद्र साटम, सुरेश लाड, ज्येष्ठ नेते अतुल पाटील, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख संतोष भोईर, रामदास शेवाळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महादेव पाटील, मनसेचे जिल्हाध्यक्ष जितेंद्र पाटील, रिपब्लिकन पक्ष आठवले गटाचे जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड यांच्यासह महायुतीच्या सर्व घटक पक्षांचे पदाधिकारी उपस्थित होते.

नितीन गडकरी म्हणाले की, प्रत्येकाला घर, गावागावात पाणी, शाळा, दवाखाना, रस्ता, वीज, शेतीमालाला भाव व रोजगार हे आमचे उद्दिष्ट आहे. आपल्या देशाला भय, भूक, दहशतवाद व भ्रष्टाचार यापासून मुक्त करायचे आहे. या देशात छत्रपती शिवाजी महाराजांची ‘शिवशाही’ आणि प्रभू रामचंद्रांचे ‘रामराज्य’ आणण्यासाठी नरेंद्र मोदी पुन्हा पंतप्रधान होणे आवश्यक आहे. त्यासाठी मावळच्या मतदारांनी बारणे यांना विक्रमी मताधिक्याने निवडून द्यावे.

### ‘रस्ते विकासामुळे मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती’

मावळ विधानसभा मतदारसंघात जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट (जेएनपीटी) विकसित झाल्यामुळे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होणार आहे. पनवेल ते उरण हा आठ पदरी रस्ता पूर्ण झाला आहे. पागोटे ते चौक हा 4,500 कोटी रुपयांच्या रस्त्याचे काम निवडणुकीनंतर सुरू होईल व पुढील एक-दीड वर्षात पूर्ण होईल. या रस्ते विकासाबरोबरच रस्त्यांच्या कडेला लॉजिस्टिक पार्क व इंडस्ट्रियल हब होतील व त्यातून किमान दहा हजार तरुणांना रोजगार मिळेल. या नोकऱ्यांमध्ये 80 टक्के जागा या स्थानिक भूमिपुत्रांना मिळाव्यात, अशी शासनाची भूमिका राहणार आहे.

कळंबोली जंक्शन येथील वाहतूक समस्येवर प्रभावी उपाययोजना म्हणून बहुमजली उड्डाणपूल बांधण्यात येणार असून सुमारे 1600 कोटी रुपये खर्चून हा आंतरराष्ट्रीय दर्जाचा प्रकल्प उभारण्यात येईल. हे कामही निवडणुकीनंतर सुरू होईल, असे त्यांनी सांगितले. सागरमाला प्रकल्पांतर्गत या भागात तब्बल दोन लाख कोटी रुपयांची कामे सुरू आहेत. प्रधानमंत्री सडक योजनेअंतर्गत साडेचार लाख गावांना रस्त्याने जोडण्यात आले आहे. अजून दोन लाख गावांना रस्त्याने जोडण्याचे काम सुरू आहे किंवा व्हायचे आहे, या सरकारने आत्तापर्यंत 50 लाख कोटी रुपयांची विकास कामे केली आहेत, अशी माहिती त्यांनी दिली.

### काँग्रेसवर टीकास्त्र

देशात कन्याकुमारी ते काश्मीर पर्यंत रस्त्यांची कामे सुरू आहेत. रस्ते झाले की विकास होतो. त्यातून रोजगार मिळतो आणि त्यातून गरिबी दूर होते, याकडे गडकरी यांनी लक्ष वेधले. काँग्रेसने गरीबी हटावचा नारा दिला होता, पण त्यातून फक्त काँग्रेसवाल्यांची गरिबी दूर झाली, असा टोलाही त्यांनी लगावला.

देशात एवढे मोठे रस्त्यांचे जाळे उभे करू शकलो, याचे सर्व श्रेय पुन्हा मतदारांना आहे, असे सांगून गडकरी म्हणाले की, तुम्ही भरघोस मतांनी बारणे यांना निवडून दिले नसते, तर मोदी पंतप्रधान झाले नसते आणि मी देखील मंत्री झालो नसतो. त्यामुळे देशातील विकासाचे सर्व श्रेय मतदारांना जाते.

### ‘महाराष्ट्राच्या विकासाला डबल इंजिन’

मावळ लोकसभा मतदारसंघात मोठ्या प्रमाणात विकास कामे पुण्यात खासदार बारणे यांचा सिंहाचा वाटा आहे, असे त्यांनी आवर्जून नमूद केले. बारणे हे प्रत्येक कामाचा चिकाटीने पाठपुरावा करतात. त्यामुळे ती सर्व कामे आम्हाला करावी लागतात, असे ते म्हणाले. केंद्रात व राज्यात एकाच विचारांची सरकारे असल्यास विकासाला अधिक गती मिळते. पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या डबल इंजिनमुळे महाराष्ट्राच्या विकासाची गती तिपटीने वाढल्याचे त्यांनी सांगितले. शिवसेना नेते गजानन कीर्तिकर यांनी बारणे यांच्या लोकसभेतील कामांच्या आठवणी सांगितल्या. लोकांविषयी कळवळा असलेला दमदार खासदार मिळाला, हे मावळच्या जनतेचे भाग्य आहे, असेही ते म्हणाले. केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात विकासकामे झाल्यामुळे कोकणातील दोन जागा प्रमाणे मावळची जागाही महायुतीलाच मिळणार हे निश्चित आहे, असे उदय सामंत म्हणाले.

---

# श्रीराम मंदिर निर्माण कार्यासाठी पुढाकार; म्हणून महायुतीला देऊया साथ..!

## भाजपा आमदार महेश लांडगे यांचे शिरुर मतदार संघात आवाहन

। पिंपरी।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**श्रीराम जन्मभूमी अयोध्या येथे प्रभू श्रीराम मंदिराचे स्वप्न ५०० वर्षांनी पूर्ण झाले. या मंदिराचे राष्ट्रार्पण आणि मूर्ती प्राणप्रतिष्ठा देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याहस्ते झाले. यानिमित्त देशभरामध्ये उत्सव साजरा करण्यात आला. देव-देश अन् धर्माभिमान जागृत करण्याचे काम मोदी सरकारने केले आहे. त्यामुळे या निवडणुकीत महायुतीला साथ देऊया, असे आवाहन भाजपा आमदार महेश लांडगे यांनी केले आहे.**




शिरुर लोकसभा मतदार संघात भारतीय जनता पार्टी- शिवसेना- राष्ट्रवादी- आरपीआय- रासप व मित्र पक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील निवडणुकीच्या रिंगणात आहेत. अयोध्येतील प्रभू श्रीराम मंदिर उभारणी, जम्मू-कश्मिरमधील ३७० कलम रद्द करणे, तिहेरी तलाक, सर्जिकल स्ट्राईक, जी-२० परिषद, कोविड संकटात देशाच्या आरोग्य व्यवस्थेची कामगिरी अशा विविध मुद्यांवर सर्वसामान्य नागरिकांना मोदी सरकारच्या १० वर्षांतील कामगिरीबाबत जनजागृती करण्यात येत आहे. आमदार लांडगे म्हणाले की, प्रभू श्रीराम हे भारतीयांच्या अस्मितेचे प्रतीक आहे. अयोध्या येथे मंदिर व्हावे. यासाठी अनेक पिढ्यांनी संघर्ष केला. न्यायालयीन लढा उभारला. कार सेवकांनी प्रसंगी बलिदान दिले आहे. १५ व्या शतकापासून आम्हा हिंदू बांधवांना या मंदिराची प्रतीक्षा होती.

> **भारताच्या इतिहासामध्ये प्रभू श्रीराम मंदिर कार्य सुवर्णाक्षरांनी लिहिले जाईल. प्रभू श्री रामचंद्र हे हिंदू धर्म आणि अखंड भारत या संकल्पनेचा खरा दुवा आहेत. मोदी सरकारच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्प, विविध विकासकामे आणि कल्याणकारी योजना यासोबतच देव-देश अन् सनातन संस्कृतीच्या संवर्धनाचे कार्य मोदी सरकारने केले आहे. प्रत्येक योजना, विकास प्रकल्प हा भारतीयांच्या हितासाठी राबवणाऱ्या पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वात देश जगातील महासत्ता होण्याच्या दिशेने वाटचाल करीत आहे. त्यामुळे शिरुरमधील नागरिकांनी मोदींचे हात बळकट करण्यासाठी महायुतीच्या उमेदवाराला साथ द्यावी.**
>
> **– महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, निवडणूक प्रमुख, शिरुर लोकसभा, भाजपा.**



## भूमिका

# विमान प्रवास म्हणजे आता एक दिव्यच!

**विमान प्रवास म्हणजे आता एक दिव्यच ठरत आहे. आज विमानात बसणारा प्रवासी सर्वाधिक दुर्लक्षित राहिला आहे. त्याच्यासाठीच्या सुविधा, त्याच्या सुरक्षिततेचे नियम या सगळ्याच्या अंमलबजावणीकडे फारसे लक्ष दिले जात नाही. किमान काही तास उशीर झाल्यानंतर प्रवाशांना काही सुविधा देण्याचा नियम केला गेला आहे; पण त्याची अंमलबजावणी व्यवस्थितपणे होत नाही.**



जागतिकीकरण व खुले आर्थिक धोरण स्वीकारल्यानंतर देशातील हवाई क्षेत्रामध्ये खासगी गुंतवणुकीला परवानगी देण्यात आली. याच दरम्यान मध्यमवर्गीयांच्या खिशामध्ये पैसा खुळखुळू लागला. परिणामी देशातील विमान प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या संख्येत वाढ झाली. देशातील अनेक लहान-मोठ्या शहरांमध्ये विमानतळ बांधले गेले. जुने विमानतळ अद्ययावत केले गेले. मग एका पाठोपाठ एक विमान कंपन्या निघू लागल्या. पूर्वी विमान प्रवासामध्ये मिळणारे जेवण किंवा इतर सुविधांचे मोठे अप्रूप वाटत होते. तो खर्च कमी करून थेट तिकिटांची किंमत कमी करण्याचा फंडा आला. मग तिकीट आणखी स्वस्त झाले. कळत नकळत देशातील हवाई प्रवाशांची संख्या काही पटींनी वाढू लागली. बघता बघता ती एक आवश्यक गोष्ट वाटू लागली आहे. विमानसेवेचे जाळे विस्तारत असताना, दाट धुके असले, तरीही विमानाला उड्डाण करता यावे किंवा धावपट्टीवर सुखरूप उतरता यावे, सूर्यास्तानंतर दाट काळोखामध्ये देखील उड्डाण-लँडिंग करता यावे यासाठी तंत्रज्ञान उपलब्ध असताना भारतीय मानसिकतेनुसार त्याचे येथे नियोजन करण्यात आलेले नाही. त्यामुळे दरवर्षी दिल्लीतील धुक्याने विमानप्रवासाचे वेळापत्रकच बिघडलेले आढळते. दिल्ली आणि मुंबई ही देशातील सर्वांत व्यस्त विमानतळं. या दोन्ही विमानतळांवर एक तासात सुमारे ५० विमानांचे उड्डाण होते किंवा ५० विमाने उतरतात. या दोन्ही विमानतळांचे विमानपत्रक बिघडले, की देशभरातील विमानतळांचे वेळापत्रक कोलमडते; कारण देशातील बहुतेक शहरे या दोन शहरांशी जोडलेली आहेत. सध्या हवाई प्रवास करताना तुम्ही तिकीट काढलेले विमान नक्की कधी उडेल, याचा काही अंदाज बांधता येत नाही. त्यातच विमानतळांवरील गर्दी ही एखाद्या एसटी स्टँडला लाजवेल अशी असते. त्यातच विमान उशिरा येणार असले, की ही गर्दी तुंबायला लागते. एरवी तुमच्यासाठी 'सेल'लावणाऱ्या विमान कंपन्या अशा वेळेस दाद देत नाहीत. त्यामुळे प्रवाशांचा पारा चढतो. परवा एका प्रवाश्याने थेट वैमानिकावर हात उचलल्याची घटनादेखील घडली. या घटनेचे समर्थन करता येत नसले, तरीही दहा-बारा तास उशीर झाल्यानंतर प्रवाशांची मानसिकता काय होत असेल, याचा कधी तरी कोणी तरी विचार करायला हवा हे सांगण्याची वेळ आली आहे. आज विमानात बसणारा प्रवासी सर्वाधिक दुर्लक्षित राहिला आहे. त्याच्यासाठीच्या सुविधा, त्याच्या सुरक्षिततेचे नियम या सगळ्याच्या अंमलबजावणीकडे फारसे लक्ष दिले जात नाही. किमान काही तास उशीर झाल्यानंतर प्रवाशांना काही सुविधा देण्याचा नियम केला गेला आहे; पण त्याची अंमलबजावणी होत नाही. बाहेर २० रूपयाला मिळणारी पाण्याची बाटली विमानतळावर पाचपट किमतीला का, बाहेर दहा- वीस रूपयांना मिळणारा वडापाव आत गेल्यावर एकदम २०० रूपये कसा, असे प्रश्नच तुम्ही विचारू नयेत, असेच वातावरण तयार केलेले असते. विमानतळ आणि विमानप्रवास म्हणजे सगळे पंचतारांकित! हाच नियम का, कशाला, असे विचारायला येथे बंदी आहे. विमानतळ प्रत्यक्षपणे विमान प्राधिकरणाच्या ताब्यात असले, तरीही या प्राधिकरणाचे अधिकारी किंवा कर्मचारी कोठेच दिसत नाहीत. तुम्ही समाज माध्यमावरून व्यक्त व्हा, मगच तुमची दखल घेतली जाईल, असा समज समस्त विमानतळ व्यवस्थापकांनी व विमान कंपन्यांनी करून घेतला आहे. तो कसा दूर करणार हा प्रश्न प्रवाशांना भेडसावत आहे. वास्तविक या क्षेत्रामध्ये अमाप संधी आहेत. पुढील वीस वर्षामध्ये देशामध्ये आणखी किती तरी विमानतळांची, प्रवाशांची व त्यांची वाहतूक करणाऱ्या विमानांची भर पडणार आहे. त्यातून तयार होणाऱ्या रोजगारांची संख्याही मोठी असणार आहे. मग आत्तापासूनच त्याचे योग्य नियोजन व नियमन करण्याची आवश्यकता आहे.

## संपादकीय »

### हक्कभंगाची हौस!

***हक्क कायद्याबाबत उद्दिष्टाशी विपरीत नियम करता येणार नाही, हे सुनावणीच्या वेळीच उच्च न्यायालयाने स्पष्ट केले, याचे स्वागतच...***

आपल्या देशात शिक्षण हक्क कायदा (आरटीई) आला, त्याला आता १५ वर्षे झाली. मुळात शिक्षण हा मूलभूत अधिकार असताना त्याच्या अंमलबजावणीसाठी कायदा करावा लागला आणि हा कायदा लागू झाल्यापासून त्याची उत्तम अंमलबजावणी करण्यापेक्षा त्यातील तरतुदी आणि नियमांत पळवाटा काढण्याचेच प्रयत्न सातत्याने झाले. राज्य सरकारने फेब्रुवारीत केलेला असाच एक नियमबदलाचा प्रयत्न सध्या तरी मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशामुळे हाणून पाडला गेला आहे. 'आरटीई'नुसार, वंचित वर्गातील मुलांसाठी सर्व शाळांत २५ टक्के जागा राखीव ठेवणे बंधनकारक आहे. या जागांवर या मुलांना विनामूल्य प्रवेश आणि शुल्कमाफी आहे. शाळांच्या एक किलोमीटर अंतराच्या परिसरात सरकारी किंवा अनुदानित शाळा असतील, त्या शाळांना 'आरटीई'अंतर्गत वंचित वर्गातील विद्यार्थ्यांना २५ टक्के राखीव जागांवर प्रवेश देण्याचे बंधन नसेल.

महाराणा प्रताप हे महान योध्दे म्हणून प्रसिध्द आहेत.यांचा जन्म ९ मे १९५० रोजी राजस्थानच्या कुंभलगड किल्ल्यावर झाला. महाराणा प्रताप यांची जयंती देखील विक्रमी संवत कॅलेंडरनुसार दरवर्षी ज्येष्ठ महिन्यातील शुक्ल पक्ष तृतीयेला साजरी केली जाते. जाणून घ्या त्यांच्या शौर्याचा इतिहास...

# शूर योध्दा महाराणा प्रताप

कुटुंब : त्यांचे वडील महाराणा उदय सिंह आणि आईचे नाव जीवत कंवर किंवा जयवंत कंवर होते. ते राणा संगा यांचे नातू होते. महाराणा प्रताप यांना लहानपणी सर्वजण 'कीका' नावाने हाक मारायचे. राजपुताना राज्यांमध्ये मेवाडचे स्वतःचे विशेष स्थान आहे ज्यात इतिहासाचे गौरव बाप्पा रावल, खुमान पहिला, महाराणा हमीर, महाराणा कुंभ, महाराणा सांगा, उदय सिंह आणि वीर शिरोमणी महाराणा प्रताप यांचा जन्म झाला. कुल दैवत : महाराणा प्रताप हे उदयपूर, मेवाड येथील सिसोदिया घराण्याचे राजा होते. एकलिंग महादेव हे त्यांचे कुलदैवत आहे. मेवाडच्या राणांचे दैवत एकलिंग महादेव याला मेवाडच्या इतिहासात खूप महत्त्व आहे. उदयपूर येथे एकलिंग महादेवाचे मंदिर आहे. मेवाडचे संस्थापक बाप्पा रावल यांनी हे मंदिर आठव्या शतकात बांधले आणि एकलिंगाची मूर्ती स्थापित केली.

दिल्लीची सल्तनत: प्रताप यांच्या काळात दिल्लीवर मुघल



सम्राट अकबराचे राज्य होते, ज्याला भारतातील सर्व राजे आणि सम्राटांना वश करून मुघल साम्राज्याची स्थापना करायची होती आणि संपूर्ण भारतावर इस्लामचा ध्वज फडकवायचा होता. 30 वर्षे सतत प्रयत्न करूनही महाराणा प्रताप यांनी अकबराची अधीनता स्वीकारली नाही. महाराणांची प्रतिज्ञाः महाराणा प्रताप यांनी भगवान एकलिंगजींची शपथ घेतली होती की आयुष्यभर अकबरासाठी फक्त तुर्कच तोंडातून बाहेर पडेल आणि अकबराला ते कधीही आपला राजा म्हणून स्वीकारणार नाहीत. त्याची समजूत घालण्यासाठी अकबराने चार वेळा शांती दूत पाठवले होते, परंतु महाराणा प्रताप यांनी अकबराचा प्रत्येक प्रस्ताव धुडकावून लावला.

महाराणा प्रताप यांचा घोडा : महाराणा प्रताप यांचा आवडता घोडा 'चेतक' होता. महाराणा प्रताप ज्या घोड्यावर बसायचे तो घोडा जगातील सर्वोत्तम घोड्यांपैकी एक होता. असे म्हणतात की महाराणा प्रताप तेव्हा 72 किलोचे चिलखत घालायचे आणि हातात 81 किलोचा भाला धरायचे. भाले, चिलखत आणि ढाल-तलवार यांचे एकूण वजन 208 किलो होते. राणा 208 किलो वजन घेऊन रणांगणात उतरायचा. तेव्हा त्यांची शक्ती काय असेल याचा विचार करा.

राज्याभिषेक : महाराणा प्रताप यांचा राज्याभिषेक गोगुंडा येथे झाला. युद्ध विभीषिका वेळी राणा उदयसिंगने चित्तोड सोडले आणि अरावली पर्वतावर तळ ठोकला आणि तेथे उदयपूर नावाने एक नवीन शहर वसवले जी त्यांची राजधानी झाली. भटियानी राणीच्या आसक्तीमुळे उदयसिंगने मृत्यूसमयी आपला धाकटा मुलगा जगमल याच्यांकडे गादी सोपवली होती.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादकः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांकः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# पवार-ठाकरे पक्ष काँग्रेसमध्ये विलीन ?

## पराभव जवळ दिसू लागल्याने पवारांनी केलं वक्तव्य:देवेंद्र फडणवीस

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्याबाबत सर्वात मोठं वक्तव्य केलं आहे. लोकसभा निवडणुकीनंतर शरद पवार आणि उद्धव ठाकरेंचा पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होणार असल्याचा दावा देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे.**



पराभव जवळ दिसू लागल्याने शरद पवारांनी वक्तव्य केलं आहे. लोकसभेनंतर शरद पवारांची पार्टी आणि ठाकरेंची पार्टी काँग्रेसमध्ये विलीन होणार आहे. बाळासाहेबांनी सांगितलं होतं, ज्यावेळेस काँग्रेसची युती करण्याची वेळ येईल त्यावेळेस मी माझं दुकान बंद करेन.या निवडणुकीनंतर त्यांची शिवसेना काँग्रेस बरोबर विलीन होणार आहे, असं वक्तव्य देवेंद्र फडणवीस यांनी जळगावात आपल्या भाषणात केलं. स्मिताताई वाघ येणाऱ्या 4 तारखेला भारताच्या संसदेमध्ये खासदार म्हणून निवडून जाणार आहेत. एवढ्या तापमानामध्ये आपण सभेला उपस्थित आहात. मोठ्या मताधिक्याने आपण ताईला निवडून आणणार असा संकल्प आपण केला आहे. ही निवडणूक गल्लीची नसेल तर दिल्लीची आहे हे सांगण्याकरता मी उभा आहे, असं फडणवीस यावेळी म्हणाले. उद्धव ठाकरे जळगावला आले होते. देशाच्या विकासाचा त्यांच्या भाषणात एकही मुद्दा नव्हता. त्यांनी भाषणात मोदींना शिव्या दिल्या. त्यांची नेता नीती नसलेली आघाडी आहे, अशी टीका फडणवीसांनी केली. निवडणुकीचा काळ आहे. सर्वच गोष्टी सार्वजनिक करायचा नसतात. उन्मेष पाटील यांनी आत्मचिंतन करायला पाहिजे की त्यांचे तिकीट का कापलं? उन्मेष पाटील यांचे तिकीट कापून आम्ही त्यांना वाचवलं. ही निवडणूक साधी निवडणूक नाहीय. या निवडणुकीमध्ये देशाचा नेता निवडायचा आहे, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. या ठिकाणी वेगवेगळ्या संघटना मिळून आपली महायुती तयार झाली आहे. दुसरीकडे राहुल गांधी हे त्यांच्या नेतृत्वात 24 पक्षांची खिचडी, कोणाला नेता मानायला तयार नाहीत. जो तो म्हणतो मला पाहा आणि फुला. सर्वांना मोदीजींच्या ट्रेनमध्ये बसवून सबका साथ सबका विकास म्हणत आपली ट्रेन विकासाच्या दिशेने जातेय. तर राहुल गांधींकडे फक्त इंजिन आहे. त्यांच्या ट्रेनला बोग्या नाहीत. या आघाडीमध्ये फक्त इंजिन आहे. इंजिनमध्ये सर्वसामान्य लोकांना बसायला जागा नसते, अशी टीका देवेंद्र फडणवीस यांनी केली. 1975 मध्ये दोन वर्ष भारताचे संविधान बंद करून इंदिरा गांधींनी तानाशाही आणली होती. माझा सवाल आहे. आरक्षण देणारे आणि संविधान लावणारे नरेंद्र मोदी आहेत. त्यांनी जाणीवपूर्वक बाबासाहेबांचा दोनदा पराभव केला. देशाला विकासाच्या मार्गाने घेऊन जाणाऱ्या वाघाचं नाव नरेंद्र मोदी आहे. ही गल्लीची नाही तर दिल्लीची निवडणूक आहे. कोविडच्या काळात राहुल गांधी पंतप्रधान असते तर काय झालं असतं?", असा सवाल देवेंद्र फडणवीस यांनी केला. पराभव जवळ दिसू लागल्याने शरद पवारांनी वक्तव्य केलं आहे. लोकसभेनंतर शरद पवारांची पार्टी आणि ठाकरेंची पार्टी काँग्रेसमध्ये विलीन होणार आहे. बाळासाहेबांनी सांगितलं होतं, ज्यावेळेस काँग्रेसची युती करण्याची वेळ येईल त्यावेळेस मी माझं दुकान बंद करेन.या निवडणुकीनंतर त्यांची शिवसेना काँग्रेस बरोबर विलीन होणार आहे, असं वक्तव्य देवेंद्र फडणवीस यांनी जळगावात आपल्या भाषणात केलं. स्मिताताई वाघ येणाऱ्या 4 तारखेला भारताच्या संसदेमध्ये खासदार म्हणून निवडून जाणार आहेत. एवढ्या तापमानामध्ये आपण सभेला उपस्थित आहात. मोठ्या मताधिक्याने आपण ताईला निवडून आणणार असा संकल्प आपण केला आहे.

### आमचा नेता साधा नाही

उद्धव ठाकरे अडीच वर्ष मुख्यमंत्री होते. घराबाहेर पडले नाही. कोविडची लस आपल्याच देशात नरेंद्र मोदींनी तयार करून घेतली. जगामध्ये लस बनवणारा भारत पाचवा देश होता. 140 कोटी लोकांना दोन वेळा लस मोफत दिली. शंभर देशाचे नेते म्हणतात आमचा नेता जर कोणी असेल तर नरेंद्र मोदी असेल. आमचा नेता साधा नाही. या ठिकाणी राहुल गांधी असते तर ते म्हटले असते इधर से आलू टाकतो तिकडून सोनं काढतो, अशी टीका देवेंद्र फडणवीस यांनी केली.ही निवडणूक गल्लीची नसेल तर दिल्लीची आहे हे सांगण्याकरता मी उभा आहे, असं फडणवीस यावेळी म्हणाले. उद्धव ठाकरे जळगावला आले होते. देशाच्या विकासाचा त्यांच्या भाषणात एकही मुद्दा नव्हता. त्यांनी भाषणात मोदींना शिव्या दिल्या. त्यांची नेता नीती नसलेली आघाडी आहे, अशी टीका फडणवीसांनी केली. निवडणुकीचा काळ आहे. सर्वच गोष्टी सार्वजनिक करायचा नसतात. उन्मेष पाटील यांनी आत्मचिंतन करायला पाहिजे की त्यांचे तिकीट का कापलं? उन्मेष पाटील यांचे तिकीट कापून आम्ही त्यांना वाचवलं. ही निवडणूक साधी निवडणूक नाहीय. या निवडणुकीमध्ये देशाचा नेता निवडायचा आहे, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

# मुख्यमंत्र्यांच्या ताफ्यात कार घुसवण्याचा प्रयत्न

## पोलिसांनी एका तरुणाला घेतले ताब्यात

। सोलापूर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ताफ्यात कार घुसविण्याचा आणि त्यांच्या ताफ्याचा पाठलाग करण्याची घटना समोर आली आहे. पोलिसांनी प्रकरणात एका तरुणाला ताब्यात घेतले आहे. मुख्यमंत्र्यांच्या ताफ्यात एका तरुणाने कार घुसविण्याचा आणि पाठलाग करण्याचा प्रयत्न केला.**

मुंबईतील वांद्रे-वरळी सी-लिंकवर हा प्रकार घडल्याने एकच खळबळ उडाली. पोलिसांनी तात्काळ या तरुणाला ताब्यात घेतले. त्याने हा प्रकार का केला, याचा तपास पोलीस करत आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रात्री ११:१५ च्या सुमारास मुख्यमंत्र्यांचा ताफा वरळीच्या दिशेने जात होता. त्यावेळी एक कारचालक त्याची गाडी भरधाव चालवत लेन क्रमांक ७ मध्ये आला. याच मार्गिकेवरुन मुख्यमंत्र्यांचा ताफा जात होता. पोलिसांनी कार चालकाला त्वरीत लेन ६ मध्ये जाण्याचा इशारा केला. पण हा तरुण ऐकायला तयार नव्हता. त्याने कार बाजूला न घेता. पोलिसांशी वाद घालायला सुरुवात



केली. हा तरुण कार तशीच सूसाट दामटत मुख्यमंत्र्यांच्या ताफ्यात घुसण्याचा आणि पाठलाग करण्याचा प्रयत्न करत होता. कार ताफ्याच्या मागोमाग घुसवत तोदेखील वरळीच्या दिशेने जाऊ लागला. पोलिसांनी वरळी वाहतूक विभागाच्या मदतीने त्याला थांबविले आणि त्याच्याविरोधात गुन्हा दाखल केला. त्याची चौकशी केली जात आहे. वांद्रे-वरळी सी-लिंक येथे रविवारी रात्री मुख्यमंत्र्यांच्या ताफ्यामागे कार घेऊन निघालेल्या तरुणाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या तरुणाचे शुभमकुमार जगदीश कुमार असं नाव आहे. हा ३० वर्षांचा तरुण माउंट मेरी परिसर, वांद्रे पश्चिम येथील रहिवासी असल्याचे समोर आले आहे. त्याच्याविरोधात वांद्रे पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी वेळीच सतर्कता दाखवत या तरुणाला ताफ्यात घुसण्याचा प्रयत्न करण्यापासून रोखले. पोलिसांनी वाहतूक शाखेच्या मदतीने त्याला थांबविले. त्याला ताब्यात घेण्यात आले आहे. या तरुणाने हा प्रकार का केला.

### वांद्रे-वरळी सी-लिंकवर घडला प्रकार

पोलिस याप्रकरणी पुढील तपास करत आहे. इशारा देऊन हा तरुण न थांबल्याने पोलिसांनी सखोल तपास सुरु केला आहे.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ताफ्यात कार घुसविण्याचा आणि त्यांच्या ताफ्याचा पाठलाग करण्याची घटना समोर आली आहे. पोलिसांनी प्रकरणात एका तरुणाला ताब्यात घेतले आहे. मुख्यमंत्र्यांच्या ताफ्यात एका तरुणाने कार घुसविण्याचा आणि पाठलाग करण्याचा प्रयत्न केला. मुंबईतील वांद्रे-वरळी सी-लिंकवर हा प्रकार घडल्याने एकच खळबळ उडाली.

# डॉक्टरच रुग्णांकडून घेत होते लाच!

## लोहिया रुग्णालयातील रॅकेटचा भांडाफोड

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**दिल्लीत सीबीआयने मोठी कारवाई केली असून, आरएमएल रुग्णालयात सुरु असलेल्या रॅकेटचा भांडाफोड केला आहे. सीबीआयने रुग्णालयातील 2 डॉक्टरांसह एकूण 9 जणांना अटक केली आहे. आरोपी उपचाराच्या नावाखाली रुग्णांची लूट करत होते असा आरोप आहे. अटक करण्यात आलेल्यांमध्ये वैद्यकीय उपकरणांचा पुरवठा करणारेही सहभागी आहेत. रुग्णालयात या सर्वांकडून एका प्रकारचं रॅकेटच चालवलं जात होतं. यामध्ये ते रुग्णाकडून पैसे लाटत होते.**






सीबीआयने अटक केलेल्यांमध्ये दोन डॉक्टरांचाही समावेश आहे. यामध्ये एक प्रोफेसर आणि एक असिस्टंट प्रोफेसर आहे. यांच्यावर गरीब रुग्णांकडून पैसे लाटल्याचा आणि वैद्यकीय उपकरणांचा पुरवठा करण्याच्या नावाखाली डिलर्सकडून पैसे घेतल्याचा आरोप आहे. सीबीआयने डॉक्टर आणि वैद्यकीय उपकरणांशी संबंधित डीलर्सच्या 15 ठिकाणांवर धाडी टाकल्या आहेत. सीबीआयने एफआयआरमध्ये एकूण 16 आरोपींचा उल्लेख केला आहे. आरएमएल रुग्णालयातील असिस्टंट प्रोफेसर डॉक्टर पर्वतगौडा यांना जवळपास अडीच लाखांची लाच घेताना अटक करण्यात आली आहे. ही लाच त्यांना युपीआयच्या माध्यमातून मिळाली होती. याशिवाय रुग्णलायातील कॅथ लॅबचा सीनिअर टेक्निकल इंचार्ज रजनीश कुमार यालाही अटक करण्यात आली आहे. सीबीआयने कार्डिओलॉजी विभागातील प्राध्यापक डॉ. अजय राज, नर्स शालू शर्मा, रुग्णालयातील लिपिक भुवल जैस्वाल आणि संजय कुमार गुप्ता यांच्यासह पाच जणांना अटक केली आहे. त्यापैकी चारजण वेगवेगळ्या उपकरणांचा पुरवठा करणाऱ्या कंपन्यांमध्ये काम करतात. या सर्वांना सीबीआयने भ्रष्टाचार प्रतिबंधक आणि गुन्हेगारी कट 120बी अंतर्गत अटक केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हे आरोपी पाच मॉड्यूलच्या माध्यमातून भ्रष्टाचार करत होते. रुग्णांवर उपचाराच्या नावाने ते पैसे लाटत होते. स्टेंट आणि इतर वैद्यकीय गरजांचा पुरवठा, विशेष ब्रँडच्या स्टेंटचा पुरवठा, लॅबमध्ये वैद्यकीय उपकरणांचा पुरवठा, लाचेच्या बदल्यात रुग्णांना रुग्णालयात दाखल करून घेणे, बनावट वैद्यकीय प्रमाणपत्रे देण्याच्या नावाखाली रुग्णांकडून खंडणी वसूल केली जात होती. सीबीआयला राम मनोहर लोहिया रुग्णालयातील अनेक डॉक्टर आणि कर्मचारी भ्रष्टाचारात सहभागी असून वेगवेगळ्या मॉड्यूलच्या आधारे भ्रष्टाचार करत असल्याची माहिती मिळाली होती. जसं की वैद्यकीय उपकरणांचा पुरवठा, डॉक्टर्सकडून त्यांचं प्रमोशन, याच्या बदल्यात कंपन्यांकडून मोठी रक्कम, गरिबांवर उपचार करण्याच्या नावाखाली क्लर्ककडून पैशांची वसुली अशा अनेक गोष्टी केल्या जात होत्या. सीबीआयने अटक केलेल्यांमध्ये

### वेगवेगळ्या मॉड्यूलच्या आधारे भ्रष्टाचार

आरएमएल रुग्णालयातील असिस्टंट प्रोफेसर डॉक्टर पर्वतगौडा यांना जवळपास अडीच लाखांची लाच घेताना अटक करण्यात आली आहे. ही लाच त्यांना युपीआयच्या माध्यमातून मिळाली होती. याशिवाय रुग्णलायातील कॅथ लॅबचा सीनिअर टेक्निकल इंचार्ज रजनीश कुमार यालाही अटक करण्यात आली आहे. सीबीआयने कार्डिओलॉजी विभागातील प्राध्यापक डॉ. अजय राज, नर्स शालू शर्मा, रुग्णालयातील लिपिक भुवल जैस्वाल आणि संजय कुमार गुप्ता यांच्यासह पाच जणांना अटक केली आहे. त्यापैकी चारजण वेगवेगळ्या उपकरणांचा पुरवठा करणाऱ्या कंपन्यांमध्ये काम करतात. या सर्वांना सीबीआयने भ्रष्टाचार प्रतिबंधक आणि गुन्हेगारी कट 120बी अंतर्गत अटक केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हे आरोपी पाच मॉड्यूलच्या माध्यमातून भ्रष्टाचार करत होते. रुग्णांवर उपचाराच्या नावाने ते पैसे लाटत होते. स्टेंट आणि इतर वैद्यकीय गरजांचा पुरवठा, विशेष ब्रँडच्या स्टेंटचा पुरवठा, लॅबमध्ये वैद्यकीय उपकरणांचा पुरवठा, लाचेच्या बदल्यात रुग्णांना रुग्णालयात दाखल करून घेणे, बनावट वैद्यकीय प्रमाणपत्रे देण्याच्या नावाखाली रुग्णांकडून खंडणी वसूल केली जात होती.

दोन डॉक्टरांचाही समावेश आहे. यामध्ये एक प्रोफेसर आणि एक असिस्टंट प्रोफेसर आहे. यांच्यावर गरीब रुग्णांकडून पैसे लाटल्याचा आणि वैद्यकीय उपकरणांचा पुरवठा करण्याच्या नावाखाली डिलर्सकडून पैसे घेतल्याचा आरोप आहे. सीबीआयने डॉक्टर आणि वैद्यकीय उपकरणांशी संबंधित डीलर्सच्या 15 ठिकाणांवर धाडी टाकल्या आहेत. सीबीआयने एफआयआरमध्ये एकूण 16 आरोपींचा उल्लेख केला आहे. आरएमएल रुग्णालयातील असिस्टंट प्रोफेसर डॉक्टर पर्वतगौडा यांना जवळपास अडीच लाखांची लाच घेताना अटक करण्यात आली आहे. ही लाच त्यांना युपीआयच्या माध्यमातून मिळाली होती. याशिवाय रुग्णलायातील कॅथ लॅबचा सीनिअर टेक्निकल इंचार्ज रजनीश कुमार यालाही अटक करण्यात आली आहे.

# इंडिया आघाडीचं शिष्टमंडळ राष्ट्रपतींना भेटणार

## निवडणूक आयोगाच्या कामकाजाबाबत इंडिया आघाडीची नाराजी

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**इंडिया आघाडीचं शिष्टमंडळ उद्या देशाच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेणार आहेत. या भेटीत इंडिया आघाडीचे नेते निवडणूक आयोगाच्या कामकाजाबाबत राष्ट्रपतींकडे तक्रार करण्याची शक्यता आहे.**

देशात लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरु असतानाच आता इंडिया आघाडीचं शिष्टमंडळ थेट देशाच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेणार असल्याची माहिती समोर येत आहे. इंडिया आघाडीला केंद्रीय निवडणूक आयोगाच्या कामकाजांवर संशय आहे. त्यामुळे इंडिया आघाडीचं शिष्टमंडळ थेट आता राष्ट्रपतींशी या विषयावर चर्चा करणार आहे. इंडिया आघाडीचं शिष्टमंडळ उद्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेणार आहे. मतदानाच्या वाढत्या टक्केवारीच्या आरोपांवरुन शिष्टमंडळ राष्ट्रपतींची भेट घेणार आहे. शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी याबाबतची माहिती दिली आहे. देशात लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या तीन टप्प्यातील मतदान झालं आहे. त्यानंतर मतदानाची टक्केवारी वाढल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे.

मतदानाच्या टक्केवारीत तफावत कशी? यावरुन विरोधक निवडणूक आयोगाच्या



कारभारावर प्रश्न उपस्थित करत आहेत. तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्षा ममता बॅनर्जी यांनी निवडणूक आयोगाला पत्र लिहून या संदर्भात स्पष्टीकरणाची मागणी केली. लोकसभा निवडणुकीचा मतदानाचा पहिला टप्पा हा 19 एप्रिलला पार पडला. या दिवशी देशामध्ये संध्याकाळपर्यंत सरासरी 60 टक्के मतदान झालं. यानंतर दुसऱ्या टप्प्यासाठी 26 एप्रिलला मतदान पार पडलं. या दिवशी सरासरी 61 टक्के मतदान झाल्याची माहिती देण्यात आली. दोन्ही टप्पे मिळून 60 टक्के सरासरी मतदान झाल्याचं निवडणूक आयोगाने कळवलं. मात्र 11 दिवसांनी म्हणजेच 30 एप्रिलला 66 टक्के मतदान झाल्याची सुधारित आकडेवारी निवडणूक आयोगाने दिली. याचाच अर्थ आधी आणि नंतर दिलेल्या आकडेवारीत 6 टक्क्यांचा फरक आहे. याआधीपर्यंत मतदानाच्या दुसऱ्या दिवशी जी आकडेवारी मिळायची तीच अंतिम मानली जायची. पण यंदा 11 दिवसांनी सुधारित आकडेवारी जाहीर करण्यात आली. त्यामुळे हा विलंब का लागला? याचं उत्तर विरोधक निवडणूक आयोगाकडे मागत आहेत.

### आयोगाच्या कारभारावर सवाल

विरोधकांचा आरोप आहे की, निवडणूक आयोगाने केवळ किती टक्के मतदान झालं याची आकडेवारी यावेळी दिली. प्रत्यक्षात कोणत्या मतदारसंघात किती मतदान झालं ते जाहीर केलं नाही. काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी याबाबत प्रश्न उपस्थित केले. पहिल्या टप्प्यातील मतदानाचे आकडे 11 दिवसांनंतर का आले? दुसऱ्या टप्प्यातील मतदानाचे आकडे 4 दिवसानंतर येण्याचा अर्थ काय? मतदानाच्या 24 तासांच्या आत आकडेवारी का आली नाही? अंदाजित आणि अंतिम आकडेवारीत इतका फरक कसा झाला? असे अनेक प्रश्न जयराम रमेश यांनी उपस्थित केले आहेत.

# परिणीती चोप्राने नवऱ्याची केली गोड तक्रार

अभिनेत्री परिणीती चोप्रा आणि आम आदमी पक्षाचे खासदार राघव चड्ढांनी गेल्यावर्षी २४ सप्टेंबरला लग्नगाठ बांधली. उदयपूरमध्ये यांचा शाही विवाहसोहळा थाटामाटात पार पडला होता. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत परिणीतीने तिच्या लग्नाबद्दल भाष्य केलं आहे. बॉलीवूड हंमाला दिलेल्या मुलाखतीत परिणीतीने लग्नानंतर राजकारणातील घडामोडी फॉलो करण्यास सुरुवात केल्याचं सांगितलं. अभिनेत्री म्हणाली, “आता फॉलो करावंच लागेल ना...पण, माझी तक्रार अशी आहे की, राघव अजिबात मनोरंजन क्षेत्रातील घडामोडी फॉलो करत नाही. त्याला काय सुरू आहे हे माहितीच नसतं. बरीच गाणी त्याला माहिती आहेत. पण, अनेकदा ती गाणी माझ्या चित्रपटातील आहेत हे सुद्धा त्याला माहिती नसतं.”अगदी खरं सांगायचं झालं, राघवला सिनेमातलं नी मला राजकारणातलं काहीही कळत नाही. त्यामुळे आम्ही नेहमी आमच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल गप्पा मारत असतो आणि मला वाटतं तेच सगळ्याच जास्त छान आहे. आता हळुहळू मला त्याच्या कामाबद्दल माहिती होतेय.” असं परिणीतीने सांगितलं.राजकीय क्षेत्राशी निगडीत असलेल्या राघव चड्ढांबरोबर झालेल्या लग्नाबद्दल परिणीती सांगते, “इंडस्ट्रीशी संबंधित नसलेल्या व्यक्तीशी लग्न झालं ही खरंच खूप छान गोष्ट आहे. कारण, माझं वैयक्तिक जीवन हे चित्रपटसृष्टीपेक्षा फार वेगळं आहे. राघवमुळे माझं आयुष्य अधिक सामान्य आणि सुखकर झालं.”दरम्यान, नुकताच परिणीतीचा अमर सिंग चमकिला चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आला. यामध्ये तिच्याबरोबर अभिनेता दिलजीत दोसांझने प्रमुख भूमिका साकारली आहे.अभिनेत्री परिणीती चोप्रा आणि आम आदमी पक्षाचे खासदार राघव चड्ढांनी गेल्यावर्षी २४ सप्टेंबरला लग्नगाठ बांधली. उदयपूरमध्ये यांचा शाही विवाहसोहळा थाटामाटात पार पडला होता. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत परिणीतीने तिच्या लग्नाबद्दल भाष्य केलं आहे. बॉलीवूड हंमाला दिलेल्या मुलाखतीत परिणीतीने लग्नानंतर राजकारणातील घडामोडी फॉलो करण्यास सुरुवात केल्याचं सांगितलं. अभिनेत्री म्हणाली, “आता फॉलो करावंच लागेल ना...पण, माझी तक्रार अशी आहे की, राघव अजिबात मनोरंजन क्षेत्रातील घडामोडी फॉलो करत नाही. त्याला काय सुरू आहे हे माहितीच नसतं. बरीच गाणी त्याला माहिती आहेत. पण, अनेकदा ती गाणी माझ्या चित्रपटातील आहेत हे सुद्धा त्याला माहिती नसतं.



# रणवीर आणि दीपिकाच्या नात्यात दुरावा?



अभिनेत्री दीपिका पदुकोण व रणवीर सिंह बॉलीवूडमधील लोकप्रिय कपल आहे. ऑनस्क्रीनबरोबरच ऑफस्क्रीन केमिस्ट्रीमुळे दोघे नेहमीच चर्चेत असतात. लवकरच आई-बाबा होणाऱ्या या कपलचा एक फोटो नुकताच व्हायरल झाला होता. अशातच रणवीरने दीपिका आणि त्याचे लग्नातले फोटोज त्याच्या इन्स्टाग्राम अकाउंटवरून डिलीट केले आहेत. मंगळवारी रणवीर सिंहने त्याच्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाउंटवरून दीपिका आणि रणवीरचे जुने फोटोज डिलीट केले किंवा लपवले आहेत, अशी चर्चा सुरू आहे. जानेवारी २०२३ पासूनचे त्यांचे सगळे जुने फोटोज अभिनेत्याने डिलीट केले. यामध्ये या कपलच्या लग्नातले फोटोजही गायब झाले आहेत. जरी २०१८ मधील त्यांच्या लग्नाचे फोटो इन्स्टाग्राम प्रोफाईलवर नसले, तरी अलीकडचे त्यांचे दिवाळी सेलिब्रेशनचे आणि लग्नाच्या वाढदिवसाचे फोटोज त्याच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर आहेत. अभिनेत्याच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर एकूण १३३ पोस्ट्स आहेत.रणवीरच्या फोटो डिलीट करण्यामागे सोशल मीडिया स्ट्रॅटेजी असण्याची दाट शक्यता आहे. या जोडप्यासाठी हे नवीन नाही, कारण यापूर्वीदेखील दीपिका पदुकोणने असेच काहीतरी केले होते. अभिनेत्रीने तिच्या सगळ्या पोस्ट डिलीट केल्या होत्या. ३१ डिसेंबर २०२० रोजी तिने तिच्या इन्स्टाग्राम प्रोफाइलवरील एकूण एक पोस्ट डिलीट केली होती आणि एका ऑडिओ क्लिपद्वारे नवी सुरुवात केली होती.रणवीरने डिलीट केलेले फोटोज दीपिकाच्या प्रोफाईलवर आधी दिसत नव्हते, परंतु नंतर लग्नाचे फोटोज सोडून बाकीचे फोटोज अजूनही गायब आहेत. नुकतेच दीपिकाच्या बेबी बंपचे फोटोज सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. या फोटोजमध्ये रणवीर आणि दीपिका एका जहाजातून उतरताना दिसत होते. दीपिकाने या फोटोमध्ये लूज टीशर्ट ड्रेस आणि निळ्या रंगाची जिन्स परिधान केली होती, तर रणवीर सिंगने ऑल व्हाईट लूकची निवड केली होती.

# दीपिका करतेय सिंघम अगेन

लवकरच आई होणारी अभिनेत्री दीपिका पदुकोण नुकतीच ‘सिंघम अगेन’च्या सेटवर दिसली. ‘गुड न्यूज’ दिल्यानंतर पहिल्यांदाच दीपिकानं तिचं बेबी बंप दाखवलं. आगामी चित्रपटासाठी ॲक्शन सीक्वेन्सचं शूटिंग करण्यासाठी अभिनेत्री पोलिसांच्या गणवेशात सेटवर आली होती. याचे फोटोज सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत. पोलिसांचे खाकी कपडे, केसांचा बन, डोळ्यांवर ग्लासेस अशा लूकमध्ये अभिनेत्री सेटवर सज्ज झाली होती. दीपिकाने एक सीन शूट केला; ज्यामध्ये गुंडांच्या पोशाखात अनेक पुरुष होते.हाय वेस्ट पॅन्ट आणि मोठा बेल्ट लावून अभिनेत्रीनं बेबी बंप लपवण्याचा प्रयत्न यात केला गेला आहे, असं दिसतंय. दीपिका पदुकोणच्या फॅन पेजेसवरून हे फोटोज शेअर झाले होते. या फोटोजमध्ये दीपिकाच्या फाईट सीन्सपूर्वी अभिनेत्री दिग्दर्शक रोहित शेट्टी आणि स्टंट टीमच्या सदस्यांकडून सूचना घेताना दिसते आहे. दीपिका प्रेग्नंट असल्यानं तिच्या फायटिंगचे सीन ती करणार नसून, तिच्याऐवजी स्टंट्स करणारी दुसरी व्यक्ती असेल, अशी शक्यता वर्तवली जात आहे. शूटिंगच्या ठिकाणी दीपिकासारखेच कपडे आणि हेअरस्टाईल असणारी व्यक्ती तिथे उपस्थित होती. तेव्हा दीपिकाचं शूटींग सुरू होतं. ‘सिंघम अगेन’ चित्रपटाद्वारे दीपिका पहिल्यांदाच पोलिसाच्या भूमिकेत दिसणार ही भूमिका साकारत लेडी सिंघम म्हणून दीपिका रोहित शेट्टीच्या पोलिसी संघात सामील झाली आहे.सिंघम अगेन’चं चित्रीकरण गेल्या वर्षी हैदराबादमध्ये सुरू झालं. रोहित शेट्टी दिग्दर्शित ‘सिंघम अगेन’ १५ ऑगस्टला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

# जान्हवी कपूरच्या ‘उलझ’चा टीझर प्रदर्शित

धडक’ चित्रपटाच्या माध्यमातून बॉलीवूडमध्ये पदार्पण करणारी श्रीदेवींची मुलगी अभिनेत्री जान्हवी कपूर विविधांगी भूमिका साकारताना दिसत आहे. तिने अल्पावधीत आपल्या अभिनयाने बॉलीवूडमध्ये एक वेगळं स्थान निर्माण केलं आहे. आता एका दमदार भूमिकेत जान्हवी कपूर प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. ‘उलझ’ असं तिच्या आगामी चित्रपटाचं नाव असून नुकताच चित्रपटाचा जबरदस्त टीझर प्रदर्शित झाला आहे. गेल्या वर्षभरापासून जान्हवी कपूर ‘उलझ’ चित्रपटाच्या चित्रीकरणासंदर्भात अपडेट देत होती. चित्रपटाचं चित्रीकरण संपल्यानंतर तिने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली होती.



# अदितीने दिल्या होणाऱ्या नवऱ्याला वाढदिवसाच्या शुभेच्छा

बॉलीवूडची अभिनेत्री अदिती राव हैदरीने सिद्धार्थशी लग्न केलंय, अशा चर्चा मध्यंतरी सुरू होत्या. पण, अदितीने स्वतःच एक फोटो शेअर करत त्यांचं लग्न नाही तर साखरपुडा झालाय हे सांगितलं. अदिती व सिद्धार्थ यांनी बुधवारी (२७ मार्च रोजी) तेलंगणातील वानापर्थी जिल्ह्यातील श्रीरंगापुरम इथं साखरपुडा केला. ‘तो हो म्हणाला,’ असं कॅप्शन देत अदितीने साखरपुड्याची गुड न्यूज सोशल मीडियावर शेअर केली.आज (१७ जानेवरी) अदितीच्या होणाऱ्या नवऱ्याचा वाढदिवस आहे. या खास दिवशी अदितीने आपल्या पतीला शुभेच्छा दिल्या आहेत. दोघांचे ब्लॅक ॲंड व्हाईट रोमँटिक फोटोज तिने सोशल मीडियावर शेअर केले आहेत. या फोटोजला कॅप्शन देत अदितीने लिहिलं, “वाढदिवसाच्या खूप शुभेच्छा. खूप सारं हास्य, आयुष्यभर आनंद. तू करत असलेल्या प्रत्येक गोष्टीसाठी तुला खूप बळ येऊ दे. तुझ्या आयुष्यभराच्या चीअरलीडरकडून तुला खूप साऱ्या शुभेच्छा आणि प्रेम.”अदितीच्या या पोस्टवर अनेक चाहत्यांनी सिद्धार्थला शुभेच्छा दिल्या आहेत. एका मुलाखतीत अदिती आणि सिद्धार्थच्या लग्नाबद्दल विचारलं असता सिद्धार्थ म्हणाला होता की, “अदितीने मला होकार देण्यासाठी किती वेळ घेतला वगैरे हे प्रश्न आता दूर राहिले. मी खूप दिवस विचार करत होतो की, ही मला होकार कळवेल का? की नाही सांगेल. पण, सुदैवाने ती हो म्हणाली. आता आम्ही लग्न केव्हा करणार याचा निर्णय कुटुंबातील वरिष्ठ लोक घेतील. त्यांचा निर्णय आम्हा दोघांसाठी महत्त्वाचा असेल. ही काही चित्रपटाच्या शूटिंगची तारीख नाही की, मी ठरवेन तसं होईल. मोठ्या

# लखनौ हरली; पण मुंबईचं आव्हान संपलं!

## सनरायझर्सनं पाऊण तासात सामना घातला खिशात!

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**हैदराबादच्या विजयासह मुंबई इंडियन्स संघाचं स्पर्धेतलं आव्हान संपुष्टात आलं. पाच जेतेपदं नावावर असलेल्या मुंबईच्या संघावर २०२२नंतर प्राथमिक फेरीत गाशा गुंडाळण्याची नामुष्की ओढवली. लखनौनं दिलेलं १६६ धावांचं लक्ष्य हैदराबादने लीलया पार केलं. हार्दिक पंड्या या नव्या कर्णधाराच्या नेतृत्वात खेळणाऱ्या मुंबईची कामगिरी सर्वसाधारण झाली.**



लखनौनं प्रथम फलंदाजी करताना १६५ धावांची मजल मारली. कर्णधार के. एल. राहुल, क्विंटन डी कॉक, मार्कस स्टॉइनस, कृणाल पंड्या यांना मोठी खेळी करता आली नाही, पण आयुश बदोनी आणि निकोलस पूरन यांनी पाचव्या विकेटसाठी ५२ चेंडूत ९९ धावांची भागीदारी केली. पूरनने २६ चेंडूत ४८ तर बदोनीने ३० चेंडूत ५५ धावांची खेळी केली. हैदराबादकडून भुवनेश्वर कुमारने १२ धावांत २ विकेट्स पटकावल्या.अभिषेक शर्मा आणि ट्रॅव्हिस हेड यांनी तडाखेबंद सलामीची भागीदारी करत हैदराबादच्या विजयावर शिक्कामोर्तब केलं.हेडने ३० चेंडूत ८ चौकार आणि ८ षटकारांसह नाबाद ८९ धावांची खेळी केली. अभिषेकने २८ चेंडूत ८ चौकार आणि ६ षटकारांसह नाबाद ७५ धावांची खेळी केली. या दोघांच्या झंझावातामुळे १० विकेट्स आणि ६२ चेंडू राखून प्रचंड फरकाने विजय साकारला. अवघ्या पाऊण तासात ट्रॅव्हिस-अभिषेक जोडीने लखनौच्या लक्ष्याचा फडशा पाडला.सनरायझर्स हैदराबादचा खेळाडू नितीश कुमार रेड्डी याने आयपीएलच्या या हंगामात खूप प्रभावित केले आहे. एकीकडे त्याने फलंदाजीत चमक दाखवली, तर दुसरीकडे क्षेत्ररक्षणातही तो उत्कृष्ट कामगिरी करताना दिसला आहे. बुधवारी हैदराबाद स्टेडियमवर लखनऊ सुपर जायंट्सविरुद्ध खेळल्या गेलेल्या सामन्यात नितीश रेड्डीने शानदार झेल घेत प्रेक्षकांना चकीत केले, ज्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.ही घटना लखनऊ सुपर जायंट्सच्या डावातील तिसऱ्या षटकातच पाहायला मिळाली. भुवनेश्वर कुमारने पहिला चेंडू एलएसजीचा सलामीवीर क्विंटन डी कॉकला टाकला, तेव्हा त्याने त्याच्या आवडत्या पिकअप शॉटने तो डीप बॅकवर्ड स्क्वेअर लेगच्या दिशेने खेळला.

यानंतर सीमारेषेवरील क्षेत्ररक्षक नितीश कुमार रेड्डीने उंच उडी मारली आणि दोन्ही हातांनी तो पकडण्याचा प्रयत्न केलाजेव्हा तो उडी मारल्यानंतर खाली येऊ लागला, तेव्हा त्याचा समतोल बिघडू लागला आणि त्याचा पाय सीमारेषेवर गेला. पण शहाणपणा दाखवत त्याने लगेच चेंडू आत फेकला. त्यानंतर तो स्वतः सीमारेषेच्या आतून बाहेर गेला. त्यानंतर पुन्हा आत येत शानदार झेल पूर्ण केला. ज्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत असून नितीश कुमार रेड्डीच्या कौतुक होत आहे. नितीश कुमार रेड्डीने या हंगामात आपल्या फलंदाजीने प्रभावित केले आहे. नितीशने ८ सामन्यात २३९ धावा केल्या आहेत. त्याची सरासरी ४७.८० आहे. तर स्ट्राइक रेट १५० च्या वर आहे. यात दोन अर्धशतकांचाही समावेश आहे.नितीश कुमार रेड्डीनंतर सनवीर सिंगनेही उत्कृष्ट क्षेत्ररक्षण केले. सनवीरने पाचव्या षटकाच्या दुसऱ्या चेंडूवर मार्कस स्टॉइनिससारख्या महत्वाच्या खेळाडूला तंबूत पाठवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. भुवनेश्वर कुमारचा चेंडू मार्कसने लेग साइडकडे मारला. ज्यावर सनवीरने डायव्हिंग करत उत्कृष्ट झेल घेतला. या सामन्यात सनवीरच्या उत्कृष्ट क्षेत्ररक्षणामुळे मार्कसला अवघ्या ३ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतावे लागले.

### रेड्डीने घेतला अप्रतिम झेल

जेव्हा तो उडी मारल्यानंतर खाली येऊ लागला, तेव्हा त्याचा समतोल बिघडू लागला आणि त्याचा पाय सीमारेषेवर गेला. पण शहाणपणा दाखवत त्याने लगेच चेंडू आत फेकला. त्यानंतर तो स्वतः सीमारेषेच्या आतून बाहेर गेला. त्यानंतर पुन्हा आत येत शानदार झेल पूर्ण केला. ज्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत असून नितीश कुमार रेड्डीच्या कौतुक होत आहे. नितीश कुमार रेड्डीने या हंगामात आपल्या फलंदाजीने प्रभावित केले आहे. नितीशने ८ सामन्यात २३९ धावा केल्या आहेत. त्याची सरासरी ४७.८० आहे. तर स्ट्राइक रेट १५० च्या वर आहे. यात दोन अर्धशतकांचाही समावेश आहे.नितीश रेड्डीने शानदार झेल घेत प्रेक्षकांना चकीत केले, ज्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

---

# आझमला पाकिस्तानच्या माजी क्रिकेटपटूने दिले आव्हान

## आझमला समोरच्या दिशेने सलग 3 षटकार मारावे लागतील

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पाकिस्तान क्रिकेट संघाचा कर्णधार बाबर आझमला नवे आव्हान मिळाले आहे. २०२४ च्या टी-२० विश्वचषकासाठी पाकिस्तानचा संघ पुढे आला नसला, तरी पीसीबीने अलीकडेच त्याला मर्यादित षटकांच्या फॉर्मेटमध्ये पुन्हा संघाचे कर्णधारपद दिले आहे. आता पाकिस्तानचा माजी क्रिकेटर बासित अलीने बाबरला टी-20 विश्वचषकापूर्वी आव्हान दिले आहे. अलीचे आव्हान असे आहे की बाबर आझमला आगामी विश्वचषकात अव्वल संघाविरुद्ध षटकार मारावे लागतील.**



बाबर आझमला आव्हान देत असल्याचं बासित अली म्हणतो. बाबरला टी-२० विश्वचषकात अव्वल संघांविरुद्ध समोरच्या दिशेने सलग ३ षटकार मारावे लागतील. अली म्हणाला की, तो यूएसए, आयर्लंड किंवा युगांडासारख्या छोट्या संघांबद्दल बोलत नाही. बाबरला अव्वल संघाविरुद्ध सरळ पुढच्या दिशेला सलग ३ षटकार मारावे लागतील. बाबर यांनी हे आव्हान स्वीकारले तर पुढे येऊन सांगावे. बाबरने असे केले तर मी स्वत:चे यूट्यूब चॅनल बंद करेन, असा दावा बासित अलीने केला आहे. बाबरला हे जमत नसेल तर त्याने पाकिस्तानी संघात सलामीला फलंदाजी करणे सोडावी.काही दिवसांपूर्वी पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने गॅरी कर्स्टन यांची मर्यादित षटकांच्या फॉरमॅटसाठी नवीन प्रशिक्षक म्हणून नियुक्ती केली होती. कसोटी संघाची जबाबदारी जेसन गिलेस्पीकडे सोपवण्यात आली होती. बाबर म्हणाला की, गॅरी कर्स्टन हे खूप अनुभवी प्रशिक्षक आहेत आणि ते विश्वचषकाची तयारी खूप गांभीर्याने घेत आहेत. ते संघ व्यवस्थापनासोबत रणनीतीही शेअर करत आहेत. कर्स्टन सतत त्यांच्या योजना शेअर करत असून सरावाच्या वेळी खेळाडूंना मदतही करत आहेत.पाकिस्तानने नुकतीच न्यूझीलंडविरुद्ध ५ सामन्यांची टी-२० मालिका खेळली. पहिला सामना पावसामुळे वाया गेला होता, पण शेवटी मालिका २-२ अशी बरोबरीत सुटली. या मालिकेत बाबर आझमने ४ डाव खेळले, ज्यात त्याने १२५ धावा केल्या.

### बासित अलीचे आव्हान काय आहे?

मालिकेतील शेवटच्या सामन्यात त्याने ६९ धावांची अर्धशतकी खेळी खेळून आपल्या चांगल्या फॉर्मचे संकेत दिले.पाकिस्तान क्रिकेट संघाचा कर्णधार बाबर आझमला नवे आव्हान मिळाले आहे. २०२४ च्या टी-२० विश्वचषकासाठी पाकिस्तानचा संघ पुढे आला नसला, तरी पीसीबीने अलीकडेच त्याला मर्यादित षटकांच्या फॉर्मेटमध्ये पुन्हा संघाचे कर्णधारपद दिले आहे. आता पाकिस्तानचा माजी क्रिकेटर बासित अलीने बाबरला टी-20 विश्वचषकापूर्वी आव्हान दिले आहे. अलीचे आव्हान असे आहे की बाबर आझमला आगामी विश्वचषकात अव्वल संघाविरुद्ध षटकार मारावे लागतील.बाबर आझमला आव्हान देत असल्याचं बासित अली म्हणतो. बाबरला टी-२० विश्वचषकात अव्वल संघांविरुद्ध समोरच्या दिशेने सलग ३ षटकार मारावे लागतील.